**गृह विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,

दिनांक २९ डिसेंबर २०१६

**अधिसूचना**

**महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम.**

क्रमांक एफएलआर. ०७१६/प्र.क्र.१६९/राउशु-३.—ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाची अशी खात्री पटली आहे की, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी पुढील नियम तात्काळ अंमलात आणावेत आणि म्हणून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम (१९४९ चा २५) याच्या कलम १४३ च्या पोट-कलम (३) च्या परंतुकानुसार तरतूद केल्याप्रमाणे हे नियम आधी प्रसिद्ध न करता करण्यात यावेत;

त्याअर्थी, आता महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाच्या कलम १४३ च्या पोट-कलम (२) च्या खंड (ब) आणि (ग) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ मध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी खालील नियम करीत आहे :-

(१) या नियमांना मुंबई विदेशी मद्य (पहिली सुधारणा) नियम, २०१६ असे म्हणावे.

(२) मुंबई विदेशी मद्य नियम, १९५३ च्या नियम २५ मधील, उप नियम (४) मध्ये,–

(एक) खंड (क) मध्ये पुढील परंतुके जादा दाखल करण्यात येतील :-

"परंतु, चंद्रपूर जिल्हा वगळून, इतर जिल्ह्यांमध्ये स्थलांतरित होणाऱ्या अशा अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांची संख्या, या नियमांच्या प्रारंभाच्या वेळी जिल्ह्यामध्ये अस्तित्वात असलेल्या अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांच्या एकूण संख्येच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये :

परंतु, आणखी असे की, इतर जिल्ह्यांमधून, त्या जिल्ह्यात स्थलांतरित झालेल्या अशा अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांची संख्या, या नियमांच्या प्रारंभाच्या वेळी कोणत्याही जिल्ह्यात अस्तित्वात असलेल्या अनुज्ञप्तीप्राप्त दुकानांच्या एकूण संख्येच्या १५ टक्क्यांपेक्षा जास्त असता कामा नये :";

(दोन) उप नियम (ड) च्या उप खंड (४) मध्ये पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल,

"परंतु, या नियमांच्या प्रारंभाच्या दिनांकास किंवा त्यापूर्वी, आयुक्तांद्वारे स्थलांतर करण्यासाठीच्या अर्जाची शिफारस करण्यात आलेल्या दुकानांव्यतिरिक्त इतर अनुज्ञप्तीप्राप्त दुकाने, अशा जागेत स्थलांतरित करण्यात यावी जेथे प्रस्तावित जागेपासून ५०० मीटर हवाई अंतरामध्ये तशाच प्रकारची अनुज्ञप्ती असलेले दुकान असणार नाही," .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**पु. हि. वागदे,**
शासनाचे सह सचिव.

## HOME DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 29th December 2016

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PROHIBITION ACT.

No. FLR-0716/ CR.169/EXC.3.– Whereas, the Government of Maharashtra is satisfied that the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953 should be brought into force at once, and therefore the rule should be made without previous publication as provided by the proviso to sub-section (*3*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act, 1949 (XXV of 1949);

Now, therefore, in exercise of the powers conferred by clauses (b) and (g) of sub-section (*2*) of section 143 of the Maharashtra Prohibition Act and of all other powers enabling it in this behalf, the Government of Maharashtra hereby makes the following rules further to amend the Bombay Foreign Liquor Rules, 1953, as follows namely:-

1. These rules may be called the Bombay Foreign Liquor Rules (First Amendment) Rules, 2016.

2. In rule 25 of the Bombay Foreign Liquor Rules, 1953 in sub-rule (4),–

(i) in clause (c), the following provisos shall be added, namely:-

"Provided that, the number of such licensed shops for shifting out of the district, other than Chandrapur district, shall not exceed 15 per cent. of the total licensed shops existing in the district at the time of commencement of these rules :

Provided further that, the number of such licensed shops shifted in the district from other district, shall also not exceed 15 per cent. of the total licensed shops existing in any district at the time of commencement of these rules:";

(ii) in clause (d), in sub-clause (iv), the following proviso shall be added, namely:-

"Provided that, the licensed shops, other than those whose application for shifting has been recommended by the Commissioner on or before the date of commencement of these rules, shall be shifted to a premises where no shop with a similar license is situated within the aerial distance of 500 meters from the proposed premises;".

By order and the name of the Government of Maharashtra,

P. H. WAGDE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.